# मेट्रो ३ची धाव ३ कि.मी. पर्यंत

## डिसेंबर २०२३पर्यंत होणार १० हजार किमी चाचण्या

- पश्चिम उपनगरांना उत्तर ते दक्षिण जोडणारा मार्ग
- कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मार्गावरील चाचणी सुरू
- प्रत्यक्ष डब्यांचा वापर न करता नमुना डब्यांचा वापर

### चाचण्यांमधला वेग वाढेल

चाचण्यांमध्ये सुरुवातीला मेट्रोचे डबे ताशी १० किलोमीटर वेगाने धावतात. हळूहळू त्यांचा वेग वाढवून ताशी ६५ किमी नेला जाईल. तर पहिला टप्पा डिसेंबर २०२३ मध्ये सुरू करण्याआधी फेब्रुवारी २०२३पासून प्रत्यक्ष वेगवान चाचण्या सुरू होतील. त्यावेळी ही रेल्वे ज्या ताशी ९५ किमी वेगाने धावेल, तेवढ्या वेगाने चाचण्या घेतल्या जातील.

### एक हजार किमी चाचण्या पूर्ण

सध्या जवळपास १ हजार किलोमीटर चाचण्या विविध प्रकारे पूर्ण झाल्या आहेत. फेब्रुवारीपासून प्रत्यक्ष सेवा सुरू होईपर्यंत (सीप्झ ते बीकेसी उत्तर, डिसेंबर २०२३) तब्बल १० हजार किलोमीटरच्या अशा चाचण्या होतील, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. दुसऱ्या टप्प्यातील चाचण्या (बीकेसी दक्षिण ते कफ परेड) या जुलै २०२४पर्यंत पूर्ण केल्या जाणार आहेत.

म. टा. खास प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबईकरांची वाहतूककोंडीतून सुटका करणारा नियोजित कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाचे काम जोमाने सुरू आहे. या प्रकल्पातील गाड्यांची तीन किमी अंतराची चाचणी अलिकडेच झाली. त्याद्वारे रुळांचे सक्षमीकरण तपासण्यात आले.

मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर ते दक्षिण जोडण्यासाठी कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गाची उभारणी सुरू आहे. हा मार्ग पहिल्या टप्प्यात सीप्झ (आरे कारशेड) ते बीकेसी उत्तर असा प्रवासमार्ग सुरू होणार आहे. डिसेंबर २०२३मध्ये सुरू होणाऱ्या या टप्प्यासाठी रेल्वे गाड्यांच्या नमुन्याची चाचणी सुरू झाली आहे.

संबंधित सूत्रांनुसार, पूर्णपणे भूमिगत असलेल्या मेट्रो-३ हे उत्तरेकडील अखेरचे स्थानक सीप्झ आहे. सीप्झनंतर ही मेट्रो आरे कारशेडमध्ये जाईल. याच परिसरात सारिपूतनगरचा भाग आहे. सारिपूतनगर ते मरोळा नाका, या मार्गावर तीन किलोमीटरची चाचणी अलिकडेच झाली. यासाठी प्रत्यक्ष मेट्रोचे डबे न वापरता एकूण आठ डब्यांच्या नमुन्यांचा वापर करण्यात आला. लवकरच मरोळ नाका ते सहार रोड, असा आणखी तीन किलोमीटरवरील सराव होईल. अशाप्रकारे तीन-तीन किलोमीटरवरील रुळांची सक्षमता या चाचणीद्वारे तपासणली जाईल.

